**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८२/२०२०** | **दिनांक १३/१०/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२७५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/१०/२०२० ते १३/१०/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १४/१०/२०२० सकाळी ८:३० पासून १८/१०/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | | १४/१० | १५/१० | १६/१० | १७/१० | १८/१० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | १.० | २.४ | - | पाऊस (मिमी) | ५० | ४४ | ३५ | ३४ | १७ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३० | २९ | २९ | २९ | ३१ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २६ | २७ | २६ | २६ | २७ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९० | ९४ | ९४ | ९४ | ९२ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७१ | ८१ | ७९ | ७५ | ७९ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ४ | ७ | ९ | १० |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | आ.द. | नै. | आ. | आ.द. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ३.४ | २८७२.८ | ५१९७.२ |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्ह्यातील बऱ्याच ठिकाणी दिनांक १४ ते १८ ऑक्टोबर, २०२० दरम्यान मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे** |
| **इशारा** | **दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी रायगड जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार आणि तुरळक ठिकाणी अत्यंत जोरदार पाऊसाचा इशारा देण्यात आला आहे** |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक १८ ते २४ ऑक्टोबर, २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे.** |

| पिक | अवस्था | हवामान अंदाजवार आधारित कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **दाणे भरणे (गरव्या जाती), पक्वता (निमगरव्या आणि हळव्या जाती)** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने तयार भात पिकाची कापणी पाउसाची उघडीप असताना करावी आणि कापणी केलेले भात शेतात न ठेवता लगेचच सुरक्षित ठिकाणी नेऊन लगेच मळणी करावी आणि उत्पादीत पिक कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे.<br>• गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. नियंत्रित करावी तसेच निम गरवे भात खाचरातील पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **नागली (नाचणी)** | **पक्वता** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने पाउसाची उघडीप असताना तयार नागली पिकाची कणसे विळ्याने कापून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे आणि वाळल्या नंतर मळणी करावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने आंबा बागेतील जुन्या अनुत्पादित झाडांची तसेच घन लागवड केलेल्या बागांची छाटणीची कामे पुढे ढकलावी. तसेच आंबाच्या नवीन पालवीचे किड व रोगापासून संरक्षणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने काजूच्या नवीन पालवीचे किड व रोगापासून संरक्षणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नारळावरील इरीओफाईड कोळीच्या आणि रुगोज चक्राकार पांढरी माशीच्या नियंत्रणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी.<br>• हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नारळ बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **सुपारी** | **फळधारणा** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका व नवीन फळबाग लागवड** | **वाढीची अवस्था** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवण्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागेतील रोपांना काठीचा आधार देण्यात यावा. |

| | | |
|---|---|---|
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | - | • विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता असल्याने गाई, म्हशीं, शेळ्या व इतर जनावरांचे योग्य ते संरक्षण करावे. |
| **कुकुटपालन** | - | • विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता असल्याने पक्ष्यांचे योग्य ते संरक्षण करावे.<br>• ब्रॉयलर पक्षांना तीन आठवड्यापर्यंत त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे चार ते सहा आठवड्यापर्यंत ब्रॉयलर फिनिशर खाद्य द्यावे.<br>• ४ ते ५ दिवसांच्या पिल्लांना राणीखेत रोगावर पशुवैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. पक्ष्यांच्या आणि शेडच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष द्यावे. |
| **टिप: पाऊसाची उघडीप असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |